# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर | वर्ष ३ रे | अंक १४९ वा | शनिवार दि.०४ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB, Roma, legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## स्टार प्रचारकांमुळे वाढणार निवडणुकीची रंगत

रायपूर : छत्तीसगडमध्ये पहिल्या टप्प्यात २० जागांसाठी येत्या ७ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदानाची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतसा प्रचाराचा धुरळा उडत चालला आहे. प्रचाराच्या शेवटच्या काही दिवसांत सर्व पक्षांचे स्टार प्रचारक मैदानात उतरणार असल्याने रंगत वाढणार आहे. काँग्रेस आणि भाजपने यावेळी प्रत्येकी ४० नेत्यांची स्टार प्रचारकांची यादी जाहीर केलेली आहे.काँग्रेसच्या स्टार प्रचारकांमध्ये राहुल गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, प्रियंका गांधी–वढेरा यांचा समावेश आहे. दुसरीकडे भाजपच्या स्टार प्रचारकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आदींचा समावेश आहे. सिनेजगतातील लोकही प्रचार करणार असल्याने लोकांमध्ये आकर्षण निर्माण झाले आहे. बस्तर आणि दुर्ग क्षेत्रातील आठ मतदार संघांपासून स्टार प्रचारकांच्या प्रचारास सुरुवात होणार आहे.तिकीट वाटपानंतर जसे छत्तीसगड भाजपमध्ये घमासान निर्माण झाले आहे, तसे ते काँग्रेसमध्येही दिसून येत आहे. सरगुजा विभागातील एका माजी मंत्र्यासह चार



विद्यमान आमदारांचे तिकीट काँग्रेसने कापले आहे. तिकीट कापण्यात आलेल्या आमदार चिंतामणी महाराज यांनी जाहीरपणे भाजपमध्ये जाण्याचे संकेत दिले आहेत. महाराजांची समजूत काढण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री विष्णू देव साय यांच्यासह ज्येष्ठ नेते बृजमोहन अग्रवाल, संजय श्रीवास्तव यांनी श्रीकोट आश्रमाकडे धाव घेतली. मात्र, चिंतामणी महाराजांची नाराजी दूर झालेली नाही. महाराज जर भाजपमध्ये सामील झाले तर दोन ते तीन मतदारसंघांवर प्रभाव पडू शकतो. महाराज आधी भाजपमध्येच होते. २०१३ मध्ये तिकीट न मिळाल्याने त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. लुंड्रा मतदारसंघातून ते विधानसभेवर निवडून गेले होते. २०१८ साली त्यांना सामरी मतदारसंघ देण्यात आला. यावेळीही त्यांनी विजय मिळवला; पण यावेळी त्यांचे तिकीट कापण्यात आले आहे.

## सुप्रीम कोर्ट 'तारीख पे तारीख' न्यायालय होऊ नये, हीच इच्छा

नवी दिल्ली : महाराष्ट्राचा राजकीय संघर्ष, आमदार अपात्रता, मणिपूर हिंसाचार यांसह अनेक महत्त्वाच्या याचिकांवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठांसमोर सुनावणी सुरू आहे. सडेतोड विधाने आणि स्पष्ट भूमिकेमुळे चंद्रचडू यांची एक वेगळी प्रतिमा देशासमोर आहे.देशातील न्यायालयांमध्ये कोट्यवधी प्रकरणे प्रलंबित आहेत. याचिकांवर सातत्याने पडणा–या तारखांवर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनीचिंता व्यक्त केली असून, सर्वोच्च न्यायालय हे तारखांवर तारखा मिळणारे न्यायालय होऊ नये, अशीच इच्छा आहे, असे चंद्रचूड यांनी नमूद केले. जोपर्यंत आत्यंतिक आवश्यकता नसेल, तोपर्यंत ते प्रकरण स्थगित करावे किंवा पुढील तारीख घेऊ नये, अशी आग्रही सूचना सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी वकिलांना केली आहे. गेल्या दोन महिन्यांत वकिलांकडून ३



हजार ६८८ याचिकांसाठी पुढील तारीख मिळावी, यासाठी विनंती करण्यात आली, अशी माहिती चंद्रचूड यांनी दिली. सर्वोच्च न्यायालय हे तारीख पे तारीख असे न्यायालय होऊ नये अशी मनापासून इच्छा आहे याचा पुनरुच्चार चंद्रचूड यांनी केला. सुनावणी लांबवू नका किंवा टाळू नका सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल होण्यापासून ते प्रथमच सुनावणीसाठी येईपर्यंत किमान वेळ लागेल याची खात्री करण्यासाठी या प्रक्रियेवर पूर्णपणे लक्ष ठेवून आहे अशी माहिती चंद्रचूड यांनी यावेळी दिली. प्रकरणांची सुनावणी टळली किंवा लांबली तर मग सुनावणी लवकर घेण्याचा हेतूच अपयशी ठरतो. जर तारीख पे तारीखच मिळत राहिली तर लोकांचा न्याय व्यवस्थेवरचा विश्वास उडून जाईल. जर गरज नसेल तर पुढची तारीख देऊ नका, सुनावणी लांबवू नका किंवा टाळू नका असे आवाहन चंद्रचूड यांनी केले.महिन्याभरात २३६१ प्रकरणांत तारीख सप्टेंबर महिन्यात २३६१ प्रकरणे अशी आहेत ज्यामध्ये पुढची तारीख मागण्यात आली आहे. अशा प्रकारची मागणी करणे हेच चुकीचे आहे. अशा प्रकारे तारखाच पडत राहिला तर लोक न्यायालय म्हणून आपल्यावर विश्वास कसा काय ठेवतील? असा सवाल चंद्रचूड यांनी केले. दुसरीकडे, याआधीही सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी तारखा पडण्यावरुन एका वकिलाला खडेबोल सुनावले होते.

## वंचित च्या शेकडो कार्यकर्त्यांनी नेरूळ येथील मराठा आरक्षण उपोषणास जाहीर पाठींबा दिला.

नवी मुंबई / के एच. हनवते :– वंचित बहुजन अघाडी राष्ट्रीय नेते बहुजन हृदयसम्राट अँड. प्रकाशजी तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी सुरवातीपासून मराठा आरक्षणास आपला जाहीर पाठींबा दिला आहे आणि त्यानुसार बेलापूर तालुका नवी मुंबई वंचित बहुजन अघाडीच्या शेकडो कार्यकर्त्यांनी नेरूळ येथील उपोषणस्थळी सदिच्छा भेट देऊन या साखळी उपोषणात सामील झाले व आपला मराठा आरक्षणास जाहीर पाठींबा आसल्याचे जाहीर पत्रक दिले. वंचित च्या कार्यकर्त्यांनी उपोषण स्थळी उपस्थित राहून सारा परिसर दणाणून सोडला एक मराठा लाख मराठा..! आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे ! जरांगे पाटील आप आगे बढो हम आपके साथ है ! बाळासाहेब आंबेडकर आप आगे बढो हम आपके साथ है..! इत्यादी घोषणेने सारा नेरूळ रेल्वे स्टेशन परिसर दणाणून सोडला. त्यावेळी वंचित बहुजन अघाडीचे आजी – माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. माजी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष विरेंद्र लगाडे, भारीपचे – प्रकाश मनवर. आंकुश गायकवाड, भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय शिक्षक विजय झनके, देवानंद मनवर, संतोष वाढवे, दिपक कांबळे, अशोक साळवे, प्रभु पाईकराव, अशोक शिरसाट, संजय केदारे, सुभाष बलखंडे, गौतम चव्हाण, वसंत हनवते, आणि भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष शोभाताई कांबळे, भा.बौ. महासभा नेरूळ शाखेचे कार्यालयीन सचिव बबन कांबळे, भा.बौ.महासभा नवी मुंबई जिल्हाकोषाध्यक्ष सुनिता सुरवसे, वंचितच्या हेमलता उके, कवीता कांबळे, संगीता कांबळे, वनिता कांबळे, कमल कांबळे, वनिता बनसोडे, सुवर्णा पटेकर सह आनेक महीलांनी उपोषणस्ळी उपस्थित राहून आपला जाहीर पाठींबा दिला. या सर्व वंचित बहुजन अघाडी कार्यकर्त्यांचे बेलापूर तालुका माजी उपाध्यक्ष कल्याणराव हनवते यांनी सर्व उपस्थितांचे मनःपुर्वक जाहीर आभार व्यक्त केले. आणि मराठा आरक्षण समितीचे खालील पदाधिकारी दिलिप आमले, डि. डि. कोलते, श्री गरड सर, श्री स्वप्निल घोलप, नितीन नायकडे, दत्ता फडतरे, शेवाळे व मराठा बांधव यांनी सर्व उपस्थितांचे मनःपुर्वक जाहीर आभार व्यक्त केले. व इथून पुढील मराठा आरक्षणास व चांगल्या कार्यास हमेशा वंचित बहुजन अघाडी आपल्या सोबत राहील असा अशावाद व्यक्त केला. साखळी उपोषणात खालील सर्वच मराठा बांधव श्री अभिजीत भोसले, श्री प्रशांत सोलसकर, श्री स्वप्निल घोलप, श्री गरड, डॉक्टर श्री कोलते साहेब, श्री दत्ता फड़तरे, श्री नितिन नायकडे, श्री अनिकेत आवटे, श्री अरविंद जाधव, श्री मयूर जाधव, श्री जतिन धनावड़े, श्री दादा पवार, श्री महेश कापसे, श्री विनेश, श्री अमर पाटिल,




श्री अजय सुपेकर, श्री अभिजीत बेंडे, साखळी उपोषणात नेरूळ मधील अधिक संख्येत मराठा बांधव उपस्थित राहुन सहकार्य केले शांतता बंद कुठल्याही प्रकारची भडकावु भाषणं न करणे आसे आव्हान केले होते तसेच कुठल्याही प्रकारचे व्यसन करु नये असं अनेक नियमावली तयार केली होती आणि ती सर्वांनीच पाळली सर्वांचे मनापासून धन्यवाद अशी माहिती मराठा बांधव समाज सेवक आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांनी दिली.

## मिझोराममध्ये सत्ताधारी मिझो फ्रंटसमोर आव्हान

आयझॉल : ईशान्य भारतातील महत्त्वाचे राज्य असलेल्या मिझोराममध्ये येत्या ७ नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून विद्यमान सत्ताधारी 'मिझो नॅशनल फ्रंट'समोर (एमएनएफ) यावेळी काँग्रेस आणि 'झोराम पीपल्स मुव्हमेंट'ने (झेडपीएम) कडवे आव्हान निर्माण केले आहे. वाढता भ्रष्टाचार, शरणार्थींची वाढती संख्या आणि स्थानिक मुद्यांवर इथली निवडणूक केंद्रित झाली आहे. राज्यात विधानसभेच्या ४० जागा असून त्यातील २५ ते ३० जागा जिंकण्याचा विश्वास मुख्यमंत्री झोरांगथामा यांनी व्यक्त केलेला आहे. गत काही काळात झेडपीएम पक्षाचा प्रभाव वाढलेला आहे. या पार्श्वभूमीवर 'झोराम पीपल्स मुव्हमेंट'ला कमी लेखून चालणार नाही, अशी सत्ताधा–यांसमोरील स्थिती आहे.मुख्यमंत्री झोरांगथामा यांच्यावर जसे भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, तसे ते काँग्रेसचे नेते व माजी मुख्यमंत्री ललथनहवला यांच्याविरोधातही आहेत.

दोन्ही नेत्यांबद्दल मिझोरामच्या जनतेत संशयाची भावना आहे. मात्र असे असले तरी सध्याच्या स्थितीत 'एमएनएफ'चे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. सामाजिक–आर्थिक विकास धोरणाअंतर्गत (एसईडीपी) विविध योजना राबविणे, शरणार्थींची समस्या सोडविण्यासाठी घेतलेला पुढाकार हे मुद्दे झोरांगथामा यांच्या कामी येत आहेत. आसामसोबतचा सीमावाद तसेच अमली पदार्थांचा वाढता वापर हा मिझोरामच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. म्यानमारमधून आलेल्या शरणार्थींची बायोमॅट्रिक माहिती जमा करण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले होते.

## समाजातील शेवटच्या घटकाचा विकास करून त्याचे प्रदर्शन करण्याची हिंमत फक्त पंतप्रधान मोदींमध्येच – दिलीपराव देशमुख

लातूर/प्रतिनिधी :– स्वातंत्र्यानंतर ७० वर्ष फक्त घोटाळे झाले.मागील ९ वर्षात मात्र देशातील शेवटच्या घटकाचा विकास करण्याचे काम झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात हा विकास झाला असून त्या कामांचे प्रदर्शन करण्याची हिंमत फक्त नरेंद्र मोदी यांच्यातच आहे,असे प्रतिपादन भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी केले.

येथील दिवाणजी मंगल कार्यालयात दिल्ली येथील फ्रेंड्स एक्झिबिशनच्या वतीने भरविण्यात आलेल्या तीन दिवसीय प्रर्दशनाच्या सांगता समारंभात अध्यक्षस्थानावरून देशमुख बोलत होते.यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शैलेश गोजमगुंडे,शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रागिणी यादव,संवेदना संस्थेचे सुरेश दादा पाटील,माजी नगरसेवक रवी सुडे, बीआयएसचे वरिष्ठ अधिकारी हर्ष शुक्ला हे प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते.बुधवार दि. १ नोव्हेम्बर रोजी हे प्रदर्शन सुरु झाले होते. तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनात भारतीय मानक ब्यूरो,भारतीय पोस्ट, इंडियन जियोलॉजिकल सर्व्हे,क्वायर बोर्ड,अमूल दूध,मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्स,मिनिस्ट्री ऑफ ट्राईबल अफेन्स,मिनिस्ट्री ऑफ जल शक्ति,नेशनल अटलस ॅड थिमेटिक मॅपिंग ऑर्गनाइज़ेशन, राज्य वखार महामंडळ, भारतीय स्टेट बँक,नेशनल बुक डेपो,सर्व्हे ऑफ इंडिया,नॅशनल केमिकल फर्टिलायज़र यासह ६० ते ७० स्टॉल उभरण्यात आले होते. यावेळी बोलताना शैलेश गोजमगुंडे म्हणाले की, आमदार संभाजी पाटिल निलंगेकर यांच्या मार्गदर्शनातुन आणि खासदार सुधाकर श्रृंगारे यांच्या कल्पक नेतृत्वाखाली भरलेल्या प्रगतिशील महाराष्ट्र या प्रदर्शनातून केंद्र सरकारच्या योजना लातुरकरांच्या घरा–घरात पोहोचविण्याचे काम करण्यात आले आहे.

तीन दिवसात १५ हजार विद्यार्थी–नागरिकांची भेट....!

तीन दिवसात या प्रदर्शनाला १५ हजार विद्यार्थी आणि नागरिकांनी भेट दिली. लातूर शहरातील विविध शाळा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहुन आनंद व्यक्त केला. यावेळी दिलीपराव देशमुख यांनी खासदार सुधाकर श्रृंगारे यांच्या कार्याचे कौतुक करुन लातुरच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यात शासकीय योजनांचे प्रदर्शन पहिल्यांदाच भरविले. देशातील सरकारच्या योजना लोकांना कळाव्यात म्हणून त्यांनी घेतलेला पुढाकार जिल्हावासियांसाठी मोलाचा असल्याचे गौरवोद्गार काढले.

मान्यवारांच्या भेटी .....!

तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनला जिल्ह्यातील अनेक मान्यवरानी भेटी दिल्या.जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर–घुगे यांनी प्रदर्शन पाहुन ते अत्यंत लोकोपयोगी असल्याच्या भावना मांडल्या. लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी जनजागृतीसाठी अशी प्रदर्शने आवश्यक असल्याचे




सांगितले. चाकुरच्या बीएसएफ ट्रेनिंग सेंटरचे महानिरीक्षक सुरेश यादव यांनी भेट देऊन पाहणी केली. प्रारंभी मनमोहन भास्कर व आनंद पाल यांनी स्वागत केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अखिला श्रीनिवासन यांनी तर दीपकसिंग मेहता यानी आभार मानले.

सहभागी स्टॉलधारकांचा केला सन्मान !!

या प्रदर्शनात सहभागी झालेल्या स्टॉलधारकांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला.बेस्ट अवेरनेश स्टॉल:भारतीय मानक ब्यूरो.बेस्ट स्टॉल बैंकिंग ॅड फायनांस:स्टेट बैंक ऑफ इंडिया.बेस्ट स्टॉल इन ऑइल: ओएनजीसी, आईओसीएल.बेस्ट स्टॉल इन केमिकल ॅड फर्टिलाइज़र:आरसीएफ. बेस्ट स्टॉल इन इंन्शुरन्स: न्यु इंडिया असुरेन्स. बेस्ट इंटरैक्टिव स्टॉल: जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया.बेस्ट स्टॉल इन मेडिकल रिसर्च: आयसीएमआर.बेस्ट स्टॉल इन सायन्स ॅड मैपिंग सर्विस:एनएटीएमओ, सर्व्हे ऑफ इंडिया.बेस्ट स्टॉल इन अर्थ सायंइसेस: मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायंसेस.बेस्ट स्टॉल इन वॉटर रिसोर्सेस : सीडब्ल्यूसी,आयटीआय लिमिटेड.बेस्ट स्टॉल इन डिस्प्ले : क़्वायर बोर्ड.बेस्ट स्टॉल टूरीज़म : मिनिस्ट्री ऑफ टूरिझम.

विद्यार्थ्यांच्या स्टॉलमध्ये जेएसपीएम प्रथम

या प्रदर्शनात विद्यार्थी आणि पेटंट मिळविलेल्या शिक्षकांनी आपले शोध आणि प्रयोगाचे स्टॉल मांडले होते.यात जेएसपीएमच्या महाराष्ट्र कॉलेज ऑफ नर्सिंच्या सीपीआर मॉडेलने प्रथम क्रमांक पटकाविला. दुसरा क्रमांक लातूर कॉलेज ऑफ फार्मसीचा क्रिस्पर कॅश नाईन या प्रयोगला तर तिसरा क्रमांक स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक ऑफ लातूर ने पटकाविला. यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्याच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## संपादकीय....

# खनिज तेलाचा भार कमी करण्यासाठी ज्वारीपासून इथेनॉलचा पर्याय

सध्या भारतात उसापासून किंवा तांदळापासून इथेनॉलनिर्मिती केली जाते. पण भरमसाट पाणी लागणाऱ्या या पीकांपेक्षा ज्वारीपासून इथेनॉलचा पर्याय अधिक लाभदायक ठरेल रमेश पाध्ये भारत खनिज तेलाच्या संदर्भात स्वयंपूर्ण नव्हता, आजदेखील नाही आणि भविष्यकाळातही स्वयंपूर्ण होण्याची शक्यता नाही. आखाती देश रशिया वा अमेरिका यांच्याप्रमाणे भारतात खनिज तेल वा नैसर्गिक वायूचे फारसे साठे नाहीत. त्यामुळे खनिज तेलाच्या आयातीसाठी भारताला वर्षाला सुमारे १६ लाख कोटी रुपयांचे परकीय चलन खर्च करावे लागते. आपल्याला वस्तू व सेवा यांच्या निर्यातीद्वारे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर मिळत नसल्यामुळे खनिज तेल व नैसर्गिक वायू यांच्या आयातीसाठी खर्च होणारे परकीय चलन हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक मोठा भार ठरत आहे. ही स्थिती खनिज तेलाचा भाव बॅरलला ९३ डॉलर्स असतानाची आहे. परंतु पुढील तीन वर्षांत खनिज तेलाची किंमत बॅरलला १५0 डॉलर्स एवढी वाढण्याची शक्यता जे. पी. मॉर्गन या संस्थेने व्यक्त केली आहे. खनिज तेल असे महाग झाले, तर त्याचा अनिष्ट परिणाम भारताच्या विकास प्रक्रियेवर होईल. हा धोका टाळण्यासाठी आतापासून प्रयत्न सुरू करणे गरजेचे आहे. खनिज तेलाची आयात कमी करण्यासाठी सरकार अनेक प्रकारे प्रयत्न करत आहे. उदाहरणार्थ, रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण करून डिझेलचा वापर कमी केला जात आहे. तसेच शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू करून मोटारींचा वापर कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आता मोटारी, दुचाकी व तीनचाकी वाहने पेट्रोल वा डिझेल यांच्याऐवजी विजेवर चालविण्यास सुरुवात झाली आहे. तसेच बस आणि ट्रक ही वाहने ग्रीन हायड्रोजनवर चालविण्यास सुरुवात झाली आहे. भविष्यात रस्त्यावर धावणारी वाहने पेट्रोल वा डिझेलचा वापर न करता विजेवर वा डायड्रोजनवर चालणारी असतील. परंतु आज अस्तित्वात असणाऱ्या वाहनांचे रूपांतर विजेवरील वा हायड्रोजनवरील वाहनांमध्ये करता येणार नाही. पेट्रोल वा डिझेल यांच्याऐवजी अन्य इंधन वापरणाऱ्या वाहनांचा उत्पादन खर्च जास्त असल्यामुळे अशा वाहनांसाठी सरकारने अनुदान देण्याची प्रथा जगभर रुढ आहे, मात्र भारत सरकारला असे अनुदान देणे किती काळ परवडेल हादेखील एक मोठा प्रश्नच आहे.विकसनशील आणि गरीब देशांपुढे नवीन आव्हाने निर्माण होताना दिसतात. यामधील एक महत्त्वाचे आव्हान हवामान बदल हे आहे. अशा सर्व समस्यांचा सामना करणे कोणत्याही सरकारसाठी सोपे नाही. भारत सरकारने खनिज तेलाची आयात कमी करण्यासाठी उचललेले व्यावहारिक पाऊल म्हणजे पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळणे. सध्या पेट्रोलमध्ये सुमारे १२ टक्के इथेनॉल मिसळले जाते. ते प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. इथेनॉल हे पेट्रोलपेक्षा पर्यावरणपूरक इंधन आहे हीदेखील एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. परंतु भारतात पुरेशा प्रमाणात व कमी किमतीत इथेनॉलचे उत्पादन होत नाही. या त्रुटी अल्पवधित दूर करता येतील.

सध्या सरकारने थेट उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीस परवानगी दिली आहे. असे इथेनॉल पेट्रोलचे वितरण करणाऱ्या कंपन्या सुमारे ६५ रुपये लिटर दराने खरेदी करतात. भारतासारख्या पाण्याची टंचाई असणाऱ्या देशाने भरमसाठ पाणी लागणारे उसाचे पीक घेऊन त्याच्या रसापासून इथेनॉलची निर्मिती करावी का आणि ती देखील अधिक चांगले पर्याय उपलब्ध असताना, या दोन्ही प्रश्नांची उत्तरे नाही अशीच आहेत.

भारतात अलीकडच्या काळात तांदळापासूनही इथेनॉल निर्मिती केली जाऊ लागली आहे. तांदळाच्या उत्पादनासाठी उसाप्रमाणेच भरमसाठ पाणी लागते. तसेच तांदळापासून तयार केले जाणारे इथेनॉलही पेट्रोलचे वितरण करणाऱ्या कंपन्या ६५ रुपये लिटर या दराने खरेदी करतात. अशा रीतीने मोठ्या प्रमाणात पाणी वापरून आवाजवी दराने इथेनॉलनिर्मिती करण्याचे काम भारतात सुरू आहे. ते देखील दोन अधिक चांगले पर्याय उपलब्ध असताना! तांदळाचा वापर करून इथेनॉलची निर्मिती करण्यासाठी अन्न महामंडळ २० रुपये किलो दराने तांदूळ उपलब्ध करून देते. हाच तांदूळ खुल्या बाजारात विकण्यासाठी व्यापाऱ्यांना ३१ रुपये किलो दराने उपलब्ध करून दिला जातो. थेट उसापासून वा तांदळापासून इथेनॉल निर्मिती करण्याऐवजी ते गोड ज्वारीपासून निर्माण केले तर ते सहज ३५ रुपये लिटर दराने उपलब्ध होईल. उसाच्या पिकासाठी हेक्टरी ३३ हजार घनमीटर पाणी लागते. गोड ज्वारीच्या पिकासाठी पाण्याची गरज चार हजार घनमीटर एवढी मर्यादित असेल. सदर पिकामुळे भाकरी करण्यासाठी ज्वारी मिळेल. पिकाच्या दांड्यातील गोड रसापासून इथेनॉल तयार करता येईल आणि शिल्लक राहिलेला चोथ पशूखाद्य म्हणून वापरता येईल. याविषयीचा एक दस्तऐवज इंटरनेटवर उपलब्ध आहे. ती माहिती रमेश चंद आणि त्यांचे सहकारी यांनी सुमारे १२ वर्षांपूर्वी लिहिली होती. रमेश चंद हे आज नीति आयोगाच्या थिंक टँकचे सभासद आहेत. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते आज गोड ज्वारीपासून इथेनॉलनिर्मितीसंदर्भात मूग गिळून बसलेले दिसतात. गोड ज्वारीपासून इथेनॉलची निर्मिती करण्याचे काम ब्राझील व चीन या देशांमध्ये सुरू आहे. हे पीक शीत कटिबंधात घेता येत नाही. त्यामुळे युरोप, अमेरिका, कॅनडा अशा भूभागांवर गोड ज्वारीचा पेरा करता येत नाही. भारताचे हवामान या पिकासाठी पोषक आहे, परंतु भारतातील शेतकरी वा कारखानदार उसाच्या पिकाला प्राधान्य देताना दिसतात.जगातील १८ टक्के लोकसंख्या व पाण्याची केवळ ४ टक्के उपलब्धता असणाऱ्या भारताने ऊस व तांदूळ अशी पिके घेऊ नयेत. परंतु भारतात अशी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. त्यामुळे भाज्या व फळे अशी पिके घेण्यासाठी पाणी उपलब्ध होते. याचा अंतिम परिणाम म्हणजे लोक मोठ्या प्रमाणावर कुपोषित राहातात. अगदी अलिकडच्या काळात कर्बद्वी प्राणिल वायूचा वापर करून इथेनॉलनिर्मितीचा शोध एका भारतीय व्यक्तीने लावला आहे. या तंत्राचा वापर करून तयार होणारे इथेनॉल ३५ रुपये लिटर दराने बाजारात मिळेल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सुपुत्र या तंत्रज्ञानाचा वापर करून इथेनॉल बनविणारा कारखाना नागपूर जिल्ह्यात काढणार आहेत.गोड ज्वारीपासून इथेनॉल बनविण्याचे कारखाने व कर्बव्दी प्राणाली वायूचा वापर करून इथेनॉल बनविण्याचे कारखाने भारतात मोठ्या संख्येने निर्माण झाले की ३५ रुपये लिटर दराने इथेनॉल उपलब्ध होईल. मोटारींच्या इंजिनात छोटासा बदल करून वाहने पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉल मिसळून चालविता येतील. एवढेच नव्हे, तर पूर्णपणे इथेनॉलवर चालणरी वाहने निर्माण करता येतील. अशा रीतीने टप्प्याटप्प्याने खनिज तेलाची आयात कमी करता येईल.भारतात खनिज तेलाचे साठे नसले, तरी त्यासाठी दुसरे पर्याय आता उपलब्ध आहेत. त्यामुळे खनिज तेल महागले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. भारताची आर्थिक विकासाची घोडदौड यापुढे कोणी रोखू शकणार नाही.

# प्रजाती आणि वाणांच्या उत्क्रांतीवर प्रकाश!

(जानकी अम्मल जयंती विशेष)

अम्मल यांनी सन १९३५ साली भारतीय विज्ञान अकादमीच्या फेलो आणि सन १९५७ मध्ये इंडियन नॅशनल सायन्स अकादमीचे सदस्य म्हणून काम केले. मिशिगन विद्यापीठाने त्यांना मानद एल्एलडी दिली. सन १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार दिला. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वनीकरण मंत्रालयाने सन २000मध्ये त्यांच्या नावावर वर्गीकरण राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला. त्यांनी इंग्लंडमध्ये घालवलेल्या अनेक वर्षांमध्ये जानकीने बागांच्या विस्तृत वनस्पतींचे गुणसूत्र अभ्यास केले. गुणसूत्र संख्या आणि चाली यांच्यावरील त्यांच्या अभ्यासाने अनेक प्रकरणांमध्ये प्रजाती आणि वाणांच्या उत्क्रांतीवर प्रकाश टाकला. सन १९९५मध्ये सीडी डार्लिंग्टन यांच्यासमवेत त्यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या क्रोमोजोम अटलस ऑफ कल्टिवेटेड प्लांट्स हे एक संकलन होते ज्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या बऱ्याच लेखांचा समावेश होता. सोसायटीमध्ये त्यांनी ज्या वनस्पतींवर काम केले त्यापैकी एक म्हणजे मॅग्नोलिया होय. आजपर्यंत विस्ली येथील सोसायटीच्या आवारात त्यांनी लागवड केलेले मॅग्नोलिया झुडपे आहेत आणि त्यापैकी एकास लहान प्रकारची पांढरी फुले आहेत, ज्याचे नाव आहे– मॅग्नोलिया कोबस जानकी अम्माल. हे जपानी आणि चीनी दंतकथांमध्ये वर्णित केलेले एक फूल आहे. या जातीपासून फुललेले फ्युज सिप्पल आणि पाकळ्या बनवतात ज्याला टेपल्स म्हणतात. आज युरोपमध्ये केवळ काही रोपवाटिकांमध्ये विविध प्रकारची शेती आहे. अशी ज्ञानपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी सदर लेखातून देताहेत... संपादक.

एदावलेत कक्कट जानकी अम्मल या सायटोजेनेटिक्स आणि फायटोगॉजीमध्ये वैज्ञानिक संशोधन केलेल्या भारतीय वनस्पतिशास्त्रज्ञ होत्या. केरळातील सदाहरित वनांमधून त्यांनी औषधी गुणधर्म असलेल्या व आर्थिकदृष्ट्या मौल्यवान समजल्या जाणाऱ्या झाडाझुडपांच्या नमुन्यांचा संग्रह केला. त्या भारतीय विज्ञान अकादमीच्या एक संस्थापक होत्या. सन १९५७ मध्ये इंडियन नॅशनल सायन्स अकादमीचे सदस्य म्हणून काम केले. मिशिगन विद्यापीठाने त्यांना मानद एल्एलडी दिली. सन १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार दिला. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वनीकरण मंत्रालयाने सन २000मध्ये त्यांच्या नावावर वर्गीकरण राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला.

जानकी अम्मल यांचा जन्म दि.४ नोव्हेंबर १८९७मध्ये केरळमधील तेलिचेरी येथे झाला. त्याचे वडील दिवाण बहादूर एदावलेत कक्कट कृष्णन हे मद्रास प्रेसिडेन्सीचे उपन्यायाधीश होते. त्यांची आई देवी ही जॉन चाईल्ड हॅनिंगटन आणि कंची कुरुंबी यांच्या नात्यातील एक मुलगी होती. जानकी अम्मल यांना सहा भाऊ आणि पाच बहिणी होत्या. त्यांच्या कुटुंबातील, मुलींना बौद्धिक उद्योग आणि ललित कलांसाठी प्रोत्साहन दिले जात असे, परंतु अम्मल यांनी वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. तेलिचेरीमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर त्या मद्रासला दाखल झाल्या. तेथे त्यांनी क्वीन मेरियर्स महाविद्यालयामधून पदविका आणि पुढे प्रेसिडेन्सी महाविद्यालयातून इ.स.१९२०मध्ये वनस्पतिशास्त्राची पदवी प्राप्त केली. नंतर प्रेसिडेन्सी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या प्रेरणेने अम्मल यांनी सायटोजेनेटिक्स विषयात पदवी प्राप्त केली.

मद्रास येथे महिला ख्रिश्चन महाविद्यालयात शिकत असताना सन १९२५मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवी मिळविली. भारतात परतल्यावर त्यांनी महिला ख्रिश्चन कॉलेजमध्ये शिक्षण सुरू ठेवले. त्या प्रथम ओरिएंटल बारबोर फेलो म्हणून मिशिगनला गेल्या. तेथेही त्यांनी अमेरिकेतील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक विद्यापीठांपैकी एक असलेल्या विद्यपीठामध्ये पीएच.डी. मिळवली. दि.१ जानेवारी १९९२ रोजी एस.गोपीकृष्ण आणि वंदना कुमार यांनी प्रकाशित केलेल्या इंडिया करंट्स या नियत कालिकात त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. मिशिगन विद्यापीठाकडून डीएससी ही पदवी मिळवणाऱ्या काही आशियाई महिलांपैकी त्या एक आहेत. न आर्बर यांनी जानकी ब्रेनल म्हणून ओळखले जाणारे एक क्रॉस–ब्रीड विकसित केले. त्यांचा क्रोमोझोम स्टडीज इन निकँड्रा फिजॉलाइड्स हा लेख इ.स.१९३२मध्ये प्रकाशित झाला.

इ.स.१९२५ बार्जुर शिष्यवृत्ती मिळवून मिशिगन अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथून एमएससी पदवी घेऊन भारतात परत आल्या. इ.स.१९३१ पुन्हा मिशिगनला उच्चशिक्षण व तेथून डॉक्टर ऑफ सायन्स ही उच्च पदवी घेऊन भारतात परतल्या. लंडनच्या जॉन इन्स हॉर्टिकल्चरल इन्स्टिट्युटमध्ये वनस्पतीपेशी संशोधन उपशास्त्रज्ञ म्हणून काम केले. इ.स.१९४५पासून १९५१पर्यंत वेल्स येथील रॉयल हॉर्टिकल्चरल सोसायटीत वनस्पतीपेशी शास्त्रज्ञ म्हणून काम केले. क्रोमोसोम ॲटलास ऑफ गार्डन प्लांट्स हा प्रबंध सी.डी.जर्लिंग्टन यांच्या साह्याने प्रसिद्ध केला. सायटोजेनेटिक्समधील तज्ञ म्हणून जानकी कोयंबटूर येथील ऊस प्रजनन केंद्रात ऊस जीवशास्त्रात काम करण्यासाठी दाखल झाल्या. त्यावेळी जगातील सर्वात गोड ऊस पापुआ न्यू गिनी येथील सॅचरम ऑफिसियानारम प्रकार होता आणि भारत आग्नेय आशियातून आयात करतो. सन १९२०च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात कोयंबटूर येथे ऊस प्रजनन केंद्र सुरू करण्यात आले. प्रयोगशाळेत संकरित क्रॉस ब्रीडिंगद्वारे पॉलीप्लॉईड पेशी हाताळल्याने त्या भारतीय परिस्थितीत उसाला ऊस देण्याचे उच्च उत्पादन घेण्यास सक्षम होत्या. त्यांच्या संशोधनातून संपूर्ण भारतभर उसाच्या भौगोलिक वितरणाचे विश्लेषण करण्यास आणि साखरेम स्पॉन्टेनियमच्या उसाची उत्पत्ती भारतात झाली, हे सिद्ध करण्यास मदत केली. तथापि मागास मानल्या गेलेल्या जातीतील एकट्या महिला म्हणून त्यांचा दर्जा कोयंबटूर येथील जानकरांना अडचणीत आणणारा प्रश्न निर्माण झाला. जात आणि लिंग आधारित भेदाचा सामना करणे, त्यांच्या या कार्यामुळे प्रभावित होऊन रॉयल हॉर्टिकल्चर सोसायटीने त्यांना जगभरातील वनस्पतींच्या संग्रहासाठी प्रसिद्ध असलेल्या के गार्डन जवळील विस्ली येथे त्यांच्या कॅम्पसमध्ये सहाय्यक सायटोलॉजिस्ट म्हणून काम करण्यास आमंत्रित केले होते.

त्यांनी इंग्लंडमध्ये घालवलेल्या अनेक वर्षांमध्ये जानकीने बागांच्या विस्तृत वनस्पतींचे गुणसूत्र अभ्यास केले. गुणसूत्र संख्या आणि चाली यांच्यावरील त्यांच्या अभ्यासाने अनेक प्रकरणांमध्ये प्रजाती आणि वाणांच्या उत्क्रांतीवर प्रकाश टाकला. सन १९९५मध्ये सीडी डार्लिंग्टन यांच्यासमवेत त्यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या क्रोमोजोम अटलस ऑफ कल्टिवेटेड प्लांट्स हे एक संकलन होते ज्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या बऱ्याच लेखांचा समावेश होता. सोसायटीमध्ये त्यांनी ज्या वनस्पतींवर काम केले त्यापैकी एक म्हणजे मॅग्नोलिया होय. आजपर्यंत विस्ली येथील सोसायटीच्या आवारात त्यांनी लागवड केलेले मॅग्नोलिया झुडपे आहेत आणि त्यापैकी एकास लहान प्रकारची पांढरी फुले आहेत, ज्याचे नाव आहे– मॅग्नोलिया कोबस जानकी अम्माल. जपानी आणि चीनी दंतकथांमध्ये वर्णित केलेले एक फूल आहे. या जातीपासून फुललेले फ्युज सिप्पल आणि पाकळ्या बनवतात ज्याला टेपल्स म्हणतात. आज युरोपमध्ये केवळ काही रोपवाटिकांमध्ये विविध प्रकारची शेती आहे. त्यांचे दुःखद निधन दि.७ फेब्रुवारी १९८४ रोजी झाले.

!!जयंतीनिमित्त जानकी अम्मल यांना विनम्र अभिवादन !!

--------------------

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.
गडचिरोली, फक्त व्हॉट्स प– ९४२३७१४८८३.

# आंदोलनाचा लढा सरकार वाढवतोय तिढा

मनोज जरांगे यांनी प्रस्थापित नेत्यांना डावलून समाजातील प्रश्न उचलून घेऊन प्रस्थापित लोकांपेक्षा कितीतरी पटीने मान सन्मान आणि जनसमर्थन मिळवले आहे. कोणत्याही पक्षाचे संघटनेचे नाव न घेता लाखों लोकांना एकत्र करणे साधी गोष्ट नाही. मंत्र्यांच्या कार्यक्रमाला प्रशासनाला गर्दी जमण्याचे टार्गेट देऊनही गर्दी जमत नाही परंतु मनोज जरांगे यांच्या एका शब्दांवर लाखों लोक एकत्र येऊन जरांगे म्हणतील तस करायला तयार आहेत. याचे एकच कारण आहे ते म्हणजे सत्तर वर्षात प्रस्थापित नेत्यांनी समाजासाठी काहीच केले नाही. समाजाच्या समस्या न सोडवता स्वतः च्या संपती मध्ये वाढ करून समाजाला वैचारिक व विकासाच्या अंधारात ठेवले. परंतु मनोज जरांगे यांनी केवळ एकच मुद्दा उचलून धरून त्यावर ठाम राहिल्याने ज्यांच्या दोन दोन पिढ्या राजकारणात गेल्या त्या सर्वांना घाम फोडला. लोकांचा नेता याला म्हणत असतात. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीने अनेक वर्षे सत्तेत असलेल्या लोकांना जनसमर्थनावर घाम फोडणे खरचं सोपी गोष्ट नाही. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला सरकार व इलेक्ट्रॉनिक मिडिया थोडे वेगळे स्वरूप देऊन आंदोलनाचा तिढा वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. मुळात जरांगे यांची साधी मागणी आहे की ज्यांच्या कागदपत्रावर मराठा आहे त्यांना कुणबीचे प्रमाणपत्र द्या. या पेक्षा वेगळी मागणी नाही. आणि मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी चुकिची नाहीच. मराठा हेच कुणबी आहेत. मग अगोदरच्या काळात अज्ञान पणाने किंवा इतर काही कारणाने बऱ्याच लोकांनी कुणबी जात न लिहता मराठा जात लिहली. परंतु सरकार जर न्यायीक, अभ्यासु आणि मानवतावादी असेल तर एवढे तर कळायला पाहिजे कि मराठा हा जातीचा शब्द नाही तर समुहाचा शब्द आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्यांना मराठा संबोधले गेले याचे अनेक दाखले इतिहासात आहेत. एवढेच काय तर राष्ट्रगीतामध्ये मराठा हा प्रांतीक शब्द असल्याचे स्पष्ट लिहले आहे. पंजाब, सिंधु, द्रविड, मराठा असा स्पष्ट उल्लेख राष्ट्रगीता मध्ये आहे. आणि दररोज आपण तो उच्चारतो देखील. म्हणून पुर्वीच्या काही लोकांनी केलेल्या चुकिमुळे आजच्या लोकांना शिक्षा का? हा सरळ प्रश्न जरांगे च्या आंदोलनातुन सरकार ला आहे. मराठा कुणबी एकच असताना मराठ्यांना कुणबीचे प्रमाणपत्र देण्याची अडचण नेमकी आहे कुठे? मराठा हा प्रांतिक शब्द असल्याने तो शब्द जात कशी होणार? जाती प्रधान देशात माणसाला जात असतेच मग कुणबी ही मराठ्यांची जात नसेल तळ मराठ्यांची जात कोणती? हे प्रश्न उपस्थित राहतात. परंतु आपण प्राथमिक पातळीवर जरी बघितले तरीही लक्षात येते मराठा हेच कुणबी आहेत. मग त्यांना कुणबीचे प्रमाणपत्र देण्यासाठी एवढी ओढाताण कशासाठी? अनेकांचे जिव गेले, सरकाच्या चुकीच्या विचारामुळे आंदोलनाला हिंसक वळण लागले, अनेक तरुणांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले, आमदारांचे घरे जळाली, शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले. एक साधे असलेले आंदोलन व्यापक झाले. जरांगे सह आंदोलक घटनाबाह्य कींवा चुकिची मागणी करत नसताना झालेल्या परिणामाला जबाबदार कोण? ज्यांचे आहे त्यांना च मिळत नसेल म्हणून लोक रस्त्यावर आले. हक्क अधिकार मिळत नसतील तर रस्त्यावर उतरण्याचा अधिकार लोकांना आहे. परंतु लोकांनी रस्त्यावर उतरूच नये यासाठी सरकार लोकहिताचे काम का करत नाही? लोकांचे प्रश्न सोडवल्या गेले नाही तर रस्त्यावर उतरलेल्या लोकांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करून सरकारला नेमकं काय साध्य करायचे आहे असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. सरकार जेव्हा मराठ्यांना कुणब्याचे प्रमाणपत्र देताना टाळाटाळ करून आंदोलन दाबण्याचे प्रयत्न करते तेव्हा मराठा समाजातील कुणबीचे प्रमाणपत्र घेऊन आरक्षणाचा लाभ घेतलेले समोर का येत नाही हा सुद्धां खुप मोठा गंभीर प्रश्न आहे. आजही अनेक मराठ्यांना आरक्षणासाठी रस्त्यावर उतरणे लाजीरवाणे वाटते परंतु गुपचुप कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबिसीचा लाभ घेऊन मोकळे होणाऱ्यांची संख्या सुद्धां जास्त आहे. एकिकडे सरकार म्हणते पुरावे सादर करा तेव्हा ज्या मराठ्यांकडे कुणबीचे प्रमाणपत्र आहे त्यांनी समोर येणे गरजेचे होते. कारण विदर्भाचा जर विचार केला तर बहुसंख्य मराठ्यांकडे कूणबीचे प्रमाणपत्र आहे. आणि ते ओबीसी आरक्षणाचा फायदाही घेतात. काही काही कुटुंबात तर एक भाऊ कुणबी एक भाऊ मराठा आहे विषेश म्हणजे दोघांचा बाप एकच आहे. अशा वेळी असे पुरावे सरकारला सादर केले तर ओबिसी आरक्षणाचा फायदा आपल्याच समाजातील इतर लोकांना होईल व सर्वांना कुणबीचे प्रमाणपत्र मिळेल. परंतु अनेक ओबिसी आरक्षणाणे मराठा लाभार्थी हे समोर आले नाही, आणि ज्यांनी ओबिसी आरक्षणाचा फायदा घेऊन समाजात जागृती केली नाही यामुळे समाज कागदपत्रे तयार करण्यासाठी मागे राहीला आणि आज सरकार त्यांची ओढाताण करत आहे. आता ही मनोज जरांगे यांनी अटींवर उपोषणाला स्थगिती देऊन सरकार ला वेळ दिला. तस पाहिले तर एवढा वेळ सरकारने ही घेणे गरजेचे नव्हते. कारण मुद्दा वैधानिक आहे. तरीही मनोज जरांगे यांनी सरकार ला काम करण्यासाठी आणि लोकांना कोणताही त्रास होऊ नाही म्हणून उपोषणाला स्थगिती देऊन उपोषण मागे घेतले. जरांगे उपोषण करत असताना महाराष्ट्रातील लहानातील लहान मुलांना सुद्धां कळाले की जरांगे सरसकट कुणबी प्रमाणपत्राची मागणी करत आहेत परंतु जसेही जरांगे यांनी उपोषण मागे घेतले तसेच मुख्यमंत्री यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले सरसकट प्रमाणत्राचे बोलणे झालेच नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मनोज जरांगे म्हणतात सरकार ला २४ डिसेंबर पर्यंत वेळ दिला तर सरकार म्हणते २ जानेवारी पर्यंत वेळ आहे. थोडक्यात काय तर जरांगे यांनी उपोषण जरी मागे घेतले तरीही सरकार लोकांना चुकिची माहिती देऊन भडकवण्याचे काम करत आहे. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जसे जरांगे यांनी उपोषण मागे घेतले तेव्हाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अगदीच निकटवर्ती वकील यांनी न्यायालयात मराठा आरक्षणा विरोधात पुन्हा याचीका दाखल केली. याचीका कोणी दाखल केली हे नाव घेताही सर्वांना त्या वकिलाचे नाव माहिती आहे. मग अशा ठिकाणी प्रश्न उपस्थित राहतो की न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यावर सरकार काम करू शकते का? दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर डिसेंबर पर्यंत अपात्र आमदारांचा निकाल लागला आणि आमदार अपात्र झाले तर नवीन सरकार बनेल की राष्ट्रपती राजवट लागेल? आणि समोर निवडणूक येऊन उभी आहे. निवडणूक आचारसंहिता लागु झाल्यावर कुणबी प्रमाणपत्राचा मुद्दा निकाली निघेल का ? हे सर्व आव्हाने समोर असताना जरांगे शांततेने आंदोलन सुरू ठेऊ म्हणतात पण प्रकरण न्यायालयात असताना न्यायालयाचा निकाल येईपर्यंत त्या बाबतीत जरांगे ही काही करू शकणार नाहीत. अशी परिस्थिती समोर असताना मागच्या वेळी न्यायालयाने मागितलेला डाटा सरकारने तयार केला नाही. जर सरकार कडे डाटाच नसेल तर सरकार न्याय देईल तरी कसा? सरकारला न्यायच द्यायचा होता, सरकार जर मराठा समाजाच्या बाजुने सकारात्मक असेल तर गायकवाड समीतीचा अहवाल न्यायालयाने नाकारल्या नंतर सरकारने नवीन काय पाऊले उचलले हे अजूनही गुलदस्त्यातच आहे. केवळ बैठका घेऊन, पत्रकारपरिषदा घेऊन विषय सुटणार नाही. फडणवीस साहेबांचे जवळचे माणसे न्यायालयात याचीका दाखल करतात त्या याचिकेवर सरकार किंवा मराठ्यांची बाजु मांडणारे शासकीय कागदपत्रे आवश्यक आहेत. यासाठी मराठा हि जात नसुन तो प्रांतिक शब्द आहे आणि अनेक मराठ्यांकडे कुणबी प्रमाणपत्र असून ते आरक्षणाचा फायदा घेतात मग बाकीच्या मराठ्यानांही हा फायदा मिळावा म्हणून ज्या मराठ्यांकडे कुणबी प्रमाणपत्र आहे, एकाच घरात एक कुणबी एक मराठा आहे हे कागदपत्रे एकत्रित करून सादर केले तर न्यायची अपेक्षा करू शकतो. नाहीतर आंदोलनाचे लढा सरकार तिढा निर्माण करून कशा पद्धतीने दाबुन टाकतो हे सर्वांना माहिती आहे. एकदा कूणबी प्रमाणपत्र मिळाले तर कुणबी जात ओबीसी मध्ये येते आणि ओबीसी प्रवर्गाला संविधानीक आरक्षण आहेच. येथेच विषय संपतो. फक्त सरकारची चांगले काम करण्याची इच्छा पाहिजे.



-----------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# मग 'या' मशीनच्या मदतीने करा झोप पूर्ण; वाचा डॉक्टरांचे मत

आजकाल अनेकांना झोपेत श्वास घेण्यास अडचणी जाणवतात, हा एकप्रकारचा आजार आहे, ज्यापासून वाचण्यासाठी एक मशीन फायदेशीर ठरत असल्याचे समोर आली आहे. ऑब्स्ट्रॅक्टिव्ह स्लीप ॲप्निया (जड–) म्हणजे असा आजार; ज्यामध्ये झोपेत रुग्णाचा श्वासोच्छवास अचानक बंद होतो, अचानक सुरळीत होतो किंवा झोपेत अस्वस्थ वाटते. हा झोपेशी संबंधित आजार आहे; ज्यामध्ये बहुतेक रुग्णांना याची माहिती असते. अशा परिस्थितीत हृदयविकाराचा झटका येण्याचाही धोका असतो. ज्याप्रमाणे घोरणाऱ्या व्यक्तीला आपण घोरतोय हे लक्षात येत नाही, त्याचप्रमाणे स्लीप ॲप्नियाच्या रुग्णालाही झोपेत श्वास थांबल्याचे लक्षात येत नाही. झोपेच्या वेळी श्वासोच्छवास थांबण्याची समस्या काही सेकंदांपासून काही मिनिटांपर्यंत टिकते. अशा प्रकारे स्लीप ॲप्नियाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी उझ–झ मशीन म्हणजे पॉझिटिव्ह एअर प्रेशर मशीन फायदेशीर असल्याचे समोर आले आहे. याच विषयावर फोर्टिस मेमोरियल रिसर्च इन्स्टिट्युटचे कार्डिओथोरॅसिक ॲण्ड व्हॅस्क्युलर सर्जरी (उढतड) संचालक व प्रमुख डॉ. उदगथ धीर यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.अलीकडील अभ्यासात असे आढळून आले आहे की, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग आणि श्वसनासंबंधित स्लीप ॲप्निया असलेल्या लोकांनी दररोज चार किंवा त्याहून अधिक तास सतत पॉझिटिव्ह एअर प्रेशर (उझ–झ) मशीन वापरल्यास हृदय किंवा सेरेब्रोव्हस्क्युलर इव्हेंटचा मोठा धोका कमी होतो. उझ–झ मशीन कशी काम करते? उझ–झ मशीनचा कॉम्प्रेसर दबावयुक्त हवेचा सतत प्रवाह तयार करतो. त्यानंतर एअर फिल्टरद्वारे शुद्ध हवा नळीद्वारे रुग्णाच्या नाक किंवा तोंडाजवळील मास्कपर्यंत पोहोचवली जाते. या मशीनमुळे झोपेत कोणताही व्यत्यय न येता, तुमच्या फुप्फुसांना भरपूर शुद्ध ऑक्सिजन मिळतो.जामा नेटवर्कमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, श्वसनात अडथळा आणणाऱ्या स्लीप ॲप्निया आजारामुळे रक्तदाब वाढतो आणि हृदयाला धोका निर्माण होतो. या स्थितीमुळे हृदयाचे ठोके अनियमित होतात.फोर्टिस मेमोरियल रिसर्च इन्स्टिट्यूटचे कार्डिओथोरॅसिक ॲण्ड व्हॅस्क्युलर सर्जरी (उढतड) संचालक व प्रमुख डॉ. उदगथ धीर यांनी सांगितले की, माझे जवळपास १० ते १५ टक्के स्लीप ॲप्नियाग्रस्त रुग्ण आहेत, ते सर्व झोपेच्या वेळी योग्य ऑक्सिजनसह सुरक्षित असले पाहिजेत. जड– म्हणजे काय? स्लीप ॲप्निया असलेल्या व्यक्तींना लठ्ठपणामुळे किंवा मानेच्या भागात काही क्लॅम्पिंगमुळे शरीरात ऑक्सिजनची योग्य पातळी राखण्यात अडचण येते. परिणामी ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. पण जेव्हा मेंदूला हा कमी झालेला ऑक्सिजन प्रवाह ओळखतो, तेव्हा तो हृदयाला रिफ्लेक्स सिग्नल पाठवतो; ज्यामुळे रक्तप्रवाह, रक्तदाब व हृदयाची गती वाढते. त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांचा धोका वाढतो. झोपताना उझ–झ मशीनचा वापर करून हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी जोखीम कमी करू शकतो? एकदा स्लीप ॲप्नियाचे निदान झाले की, झोपेच्या अभ्यासादरम्यान आपण ऑक्सिजन संपृक्तता पातळी कमी झाल्याचे निरीक्षण करू शकतो. जेव्हा ऑक्सिजनची पातळी लक्षणीयरीत्या कमी होते, तेव्हा उझ–झ मशीन वापरू शकतो. ही




मशीन संरक्षण म्हणून काम करते. त्यामुळे श्वसनमार्गातील अडथळे दूर होतात आणि ऑक्सिजनच्या प्रवाहातील सातत्य सुनिश्चित होते. परिणामी रुग्ण रात्री न उठता, खोकल्याशिवाय आरामदायी झोप घेऊ शकतो. त्यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयाशी संबंधित लक्षणे कमी होतात.लठ्ठ आणि गळ्याभोवती अतिरिक्त चरबी असलेल्या रुग्णांसाठी उझ–झ मशीन हा एक चांगला उपाय आहे. कारण– अशा रुग्णांना अपुऱ्या झोपेमुळे सतत उच्च रक्तदाब होऊ शकतो. रक्तदाब नियंत्रित करण्याच्या प्रयत्नात रुग्ण सतत वेगवेगळी औषधे घेतो. अगदी दिवसातून चार वेळा अशा औषधांचे सेवन करतो. शिवाय, सहा ते आठ तासांची झोप घेत असतानाही हे रुग्ण वारंवार सकाळी तंद्री आणि सुस्ती जाणवत असल्याची तक्रार करतात; पण त्यावर उपाय म्हणून उझ–झ मशीन खूप फायदेशीर मानली जाते.हृदयासाठी झोप किती महत्त्वाची आहे? जेव्हा एखादी व्यक्ती झोपते तेव्हा शरीराच्या बरे होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते. शरीराची पुनर्प्राप्ती प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, एखाद्या व्यक्तीला सहा ते आठ तासांची शांत झोप गरजेची असते. चांगली झोप फक्त हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रणालीसाठीच नाही तर फुप्फुस आणि इतर महत्त्वाच्या अवयवांसाठीही फायदेशीर आहे. त्यात ऑक्सिजन एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. कारण– तो शरीरातील प्रत्येक पेशीसाठी आवश्यक आहे. जर एखाद्या व्यक्तीला पुरेसा ऑक्सिजन मिळत नसेल, तर कार्बन डायॉक्साइडची पातळी वाढू शकते; ज्यामुळे प्रत्येक अवयवावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

# दिवाळीत रुग्णसंख्या दुप्पट होण्याचा धोका

योग्य काळजी घेतल्यास हे आजार टळू शकतात, असे मत क्रिम्स रुग्णालयाचे संचालक व सुप्रसिद्ध श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. अशोक अरबट म्हणाले. नागपूर: उपराजधानीत उन आणि थंडीचा खेळामुळे तापमानात वारंवार बदल होत आहे. या बदलामुळे शहरात श्वसन विकाराचे रुग्ण वाढले आहेत. दिवाळीत फटाक्यांमुळे वायू प्रदुषणात वाढ होऊन हे रुग्ण वाढण्याचा धोका आहे. योग्य काळजी घेतल्यास हे आजार टळू शकतात, असे मत क्रिम्स रुग्णालयाचे संचालक व सुप्रसिद्ध श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. अशोक अरबट म्हणाले.दिवाळीता सन उत्साहात साजरा करण्यासाठी हल्ली घराघरात स्वच्छता, रंगरंगोटीसह इतरही कामे सुरू आहे. दिवाळी घराघरात दिवे, अगरबत्ती लावण्यासह फटाके फोडले जातात. हे करतांना कुणाला त्रास होणार नाही, म्हणून काळजी घ्यायला हवी. अन्यथा फटाकेसह इतर प्रदुषणामुळे सर्दी–खोकला व दम्याचा त्रास वाढतो. पूर्वापार दमा व श्वसनविकार असलेल्यांनी स्वत:चा विकार वाढू नये म्हणून जास्च काळजी घ्यावी. दरम्यान कारखाणे व इंडस्ट्रीज्, मोठी मोठी बांधकामं यामुळे कणांचे प्रदुषण वाढते. फुफ्फुसांच्या आरोग्यासाठी हे हानीकारक आहे. दिवाळीच्या फटाक्यांमुळे होणाऱ्या वायुप्रदुषणाचा त्रासही अनेकदा होऊ शकतो. दिवाळीच्या फटाक्यांमुळे त्वचेला आणि कानांना त्रास होतो. सोबतच घसा खवखवणे, डोळ्यात पाणी येणे कानात बधीरता येणे, अंगावर खाज येणे अशी लक्षणे देखील उद्भवू शकतात.फटाक्यांमधून निघणाऱ्या धुरात सल्फरडाय ऑक्साईड, कार्बन मोनोऑक्साईड, नायट्रस ऑक्साईड आणि अन्य विषारी असतात. त्यामुळे सर्दी–खोकला, दमा, सीओपीडी, इंटरस्टेशियल लंग्स डिसिज, ज्यांना कोविड होऊन गेलाय असे रुग्ण, कोविड फायब्रोसिसचे रुग्ण, अशा फुफ्फुसाची व श्वासांशी संबंधीत रुग्णांना या धुराचा त्रास होतो. त्यामुळे त्यांनी तर जाणीवपूर्वक या धुरापासून दुर रहावे, असेही डॉ. अरबट म्हणाले. याशिवाय घराला रंग देताना त्यात वापरण्यात येणाऱ्या द्रव्यामधून विशिष्ट प्रकारचा वायु निघतो. त्यामुळे देखील श्वसनाच्या समस्या उद्भवतात, असेही त्यांनी सांगितले.जेव्हा ऋतू बदलतो, तेव्हा आपल्या शरीराला त्या वातावरणाशी समरस होण्यास वेळ लागतो. त्या वेळेसही श्वसनाशी संबंधीत आजार बळावतात. दम्यासह व्हायरल फिवर, ताप, अंगदुखी, सर्दी यांचेही प्रमाण वाढते. लहान मुलांवर व ज्येष्ठ नागरिकांवर त्याचा अधिक परिणाम पडतो. अशा वेळी प्रतिबंधात्मक उपाय करून विकार होऊ नये म्हणून काळजी घ्यायला हवी.

# भारतीय डाळी, भाजणी आणि आहारशास्त्र

दिवाळीचा फराळ आणि भाजणी यांचं अतूट नातं आहे. महाराष्ट्रीयन पद्धतीमध्ये डाळी आणि भाजणीच्या डाळीपासून केल्या जाणाऱ्या पदार्थांना विशेष महत्व आहे. पल्लवी सावंत पटवर्धन दिवाळीचा फराळ आणि भाजणी यांचं अतूट नातं आहे. महाराष्ट्रीयन पद्धतीमध्ये डाळी आणि भाजणीच्या डाळीपासून केल्या जाणाऱ्या पदार्थांना विशेष महत्व आहे. अनेक डाळी भाजून त्यापासून विविध पार्थ तयार केले जातात. यात सर्वाधिक महत्वाची आणि सर्वाधिक वापरली जाणारी डाळ म्हणजे चणाडाळ. केवळ चव आणि पदार्थ तयार करण्यासाठीच नव्हे तर चांडाळीमध्ये पोषक तत्त्वे देखील भरपूर आहेत. पचायला सोपी, तंतुमय पदार्थ आणि प्रथिनांनी भरपूर अशी चणाडाळ आहार शास्त्राच्या दृष्टिकोनातून देखील महत्वाची आहे. भाजलेल्या कहाण्यांमध्ये स्निग्धांशाचे प्रमाण देखील मुबलक असते. तंतुमय पदार्थ , योग्य प्रथिने आणि मुबलक ऊर्जा असणारे चणे– ज्याला फुटाणे असेदेखील म्हटले जाते बुकेच्या संप्रेरकांचे योग्य नियोजन करतात.लहान मुलांसाठी मेंदूला उत्तम खुराक म्हणून चणे आणि त्यासोबत खाल्ले जाणारा गूळ बुद्धिवर्धक मानला जातो. त्यांना मधुमेह आहे त्यांच्यासाठी शरीरातील शर्करेचे प्रमाण कमी करण्यासाठी चणे खाणे अत्यंत आवश्यक आणि उपयोगाचे मानले जाते. गरोदर स्त्रियांमध्ये फॉलिक ॲसिडचे प्रमाण वाढवण्यासाठी फुटाणांचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे फुटाणांमध्ये असणारे जीवनसत्व अ, ब .,कॅल्शियम ,फॉस्फरस, मॅंगनीज झिंक आणि लोह फुटाण्यांना कडधान्यांमधील सर्वोत्तम दर्जाचे ठरवितात. चण्यांप्रमाणंच काही प्रमाणेच मुगडाळ देखील प्रथिने आणि तंतुमय पदार्थांनी युक्त आहे मात्र त्यासोबत मूग डाळीमध्ये जीवनसत्व अ आणि क यांचे मुबलक प्रमाण आहे. तसेच पोटॅशियम आणि मॅग्नेशियमचे उत्तम प्रमाण मुगाच्या डाळीत आढळते. भाजलेली मूग डाळ साडे सात ते आठ ग्रॅम इतके प्रथिने देते. ज्यांना रक्तदाब आहे ज्यांना उच्च रक्तदाब आहे त्यांच्यासाठी मुगडाळ अत्यंत उपयुक्त आहेत.हृदयाचे विकार असणाऱ्यांसाठी आहारात नियमितपणे मुगडाळ वापरणे अत्यंत उपयुक्त आहे. मुगडाळीमुळे शरीरातील गॅसेसचे प्रमाण देखील कमी होते. मुगडाळीतील लोह रक्तातील लोहाचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी उपयुक्त आहेत.उडीद डाळ काळे उडीद आणि पांढरा अशा दोन पद्धतीने उडदाची डाळ उपलब्ध आहे. पोटॅशियम कॅल्शियम प्रथिन विटामिन जीवनसत्व अ जीवनसत्व ब लोह यांनी भरपूर असणारी उडदाची डाळ केवळ भाजून किंवा भिजवून किंवा रात्रभर भिजवून आंबवून वापरल्यास जास्त उपयुक्त असते. हाडांची घनता वाढवणे शरीरातील लोह आणि ब जीवनसत्वाचे प्रमाण वाढवणे किडनीचे आरोग्य वाढवणे यासाठी उडदाची डाळ उपयुक्त आहे. ज्यांना किडनी स्टोनचा त्रास आहे त्यांच्यासाठी उडदाची डाळ अत्यंत उपयुक्त आहे शिवाय ज्यांना कोणत्याही प्रकारचा मज्जातंतूंचे विकार आहेत त्यांच्यासाठी उडीद डाळ अत्यंत उपयुक्त मानली जाते. मधुमेह मधुमेहापासून मधुमेहापासून दूर राहण्यासाठी उडीद डाळ अत्यंत उपयुक्त आहे कारण शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यासाठी उडीद डाळ अत्यंत उपयुक्त आहे म्हणूनच मधुमेहांच्या अनेक रुग्णांना डाळी पासून बनवलेले डोसे किंवा डाळी पासून बनवलेले पदार्थ



उडीद डाळी पासून बनवलेले पदार्थ जास्त प्रमाणात खायला सांगितले जातात.मसूर डाळ लाल मसूर किंवा अख्खी मसूर म्हणजेच काळे मसूर भारतीय आहारामध्ये अत्यंत उपयुक्त आहेत विशेषतः यापासून तयार केले जाणारे सूप आणि सॅलड मध्ये त्याचा होणारा वापर हा अत्यंत प्रसिद्ध आहे या पद्धतीने मसूर डाळ आहारात वापरताना ती भाजून घेणे किंवा ती भिजवून त्यानंतर वापरणे मसूर डाळीतील प्रथिनांचे शरीरातील प्रथिने शोषणाचे प्रमाण उपयुक्त ठरवतात मसूर डाळीमध्ये पंधरा ग्रॅम फायबर म्हणजेच तंतुमय पदार्थ असतात तर १७ ग्रॅम प्रोटीन असतात या मसूर डाळीमुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होऊ शकते दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मसूर डाळीमध्ये अत्यंत कमी प्रमाणात स्निग्धांश आढळतात त्यामुळे केवळ तांदळापासून एखादा पदार्थ बनवण्यापेक्षा मसूर डाळीचे डोसे अत्यंत उपयुक्त असतात आणि ते तुमच्या भुकेच्या संप्रेरकांवर देखील योग्य संतुलन राखतात शिवाय त्यात खनिजांचा मुबलक साठा असतो.दिवाळीचे कोणतेही पदार्थ तयार करताना डाळी भाजून त्यापासून पदार्थ तयार करण्यावर नेहमी भर दिला जातो. यामुळे तीन मुद्दे साध्य होतात एक म्हणजे डाळीतील प्रथिने उत्तम प्रकारात शरीरात शोषली जातात दोन डाळी पचायला हलक्या होतात आणि तीन शरीराला प्रथिने आणि स्निग्धांश याचा योग्य प्रमाणात साठा मिळू शकतो. भाजणीचे पीठ आणि त्यापासून बनविले जाणारे पदार्थ हिवाळ्यात शरीराला पोषक आणि आवश्यक असतात. कमी प्रमाणात उत्तम पोषकतत्त्वे आणि मुबलक ऊर्जा देणारे भाजणीचे फराळी पदार्थ खाताना त्यातील पोषणमूल्यांचा विचार होणेदेखील महत्वाचे आहे.

# चिडचिड होणं हे पित्तप्रकोपाचं लक्षण आहे?

अकारण 'क्रोध' जसा शरीरामध्ये वाढलेल्या पित्तप्रकोपाचा सूचक असतो, तसाच 'निः सहत्व' अर्थात असहनशीलतासुद्धा शरीरामध्ये पित्तप्रकोप होत असल्याचे दर्शवते. तुमच्या पाहण्यात अशी एखादी व्यक्ती आहे का जी कारणाशिवाय वारंवार उगाच चिडत असते. चिडण्याजोगे कारण असो वा नसो निमित्त मिळाले की ती व्यक्ती चिडतेच, आजूबाजूच्यांवर राग काढून त्यांना सळो की पळो करून सोडते. किंबहुना निमित्त असो वा नसो 'चिडणे–रागावणे' हा त्या व्यक्तीचा स्वभावच होऊन जातो. तर अशावेळी हा त्रास (जर त्या व्यक्तीला काही मानसिक त्रास नसेल तर) शरीरामध्ये वाढलेल्या पित्तप्रकोपाचा निदर्शक असू शकतो.एकीकडे हा अकारण 'क्रोध' जसा शरीरामध्ये वाढलेल्या पित्तप्रकोपाचा सूचक असतो, तसाच 'निः सहत्व' अर्थात असहनशीलतासुद्धा शरीरामध्ये पित्तप्रकोप होत असल्याचे दर्शवते. तुमच्या आजूबाजूला अशी व्यक्ती तुम्हाला नक्कीच भेटेल जिला सहनशीलता अजिबात नसते. मनाविरुद्ध झालेल्या कोणत्याच गोष्टी त्या व्यक्तीला अजिबात खपत नाहीत, सहन होत नाहीत. असं आहे की जगामध्ये सर्वच गोष्टी काही तुमच्या मनासारख्या होत नाहीत, तुमच्या सभोवतालच्या सर्वच घटना तुम्हाला पटण्याजोग्या होतील हेसुद्धा संभवत नाही. तुम्हाला जीवनातल्या अनेक बाबींमध्ये जगाशी–सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते, न पटणाऱ्या न रुचणाऱ्या गोष्टी एका मर्यादेपर्यंत तरी सहन कराव्या लागतातच, अन्यथा जीवन जगताच येणार नाही. मात्र पित्तप्रकृती व्यक्ती, ज्यांच्या शरीरामध्ये उष्णता आधिक्याने असते, पित्तप्रकोप झालेला असतो अशा व्यक्ती मात्र अजिबात सहनशील नसतात.

या असहनशील व क्रोधी–संतापी व्यक्तींच्या बरोबर विरोधी अशा कफप्रकृती व्यक्ती असतात, ज्या सहनशील–प्रेमळ–उदार मनाच्या व सहसा न चिडणाऱ्या सर्वांशी जमवून घेणाऱ्या अशा असतात. असहनशीलता व अकारण क्रोध या मानसिक लक्षणांवरुन शारीरिक विकृतीचे निदान करण्याची आयुर्वेदाची ही पद्धत अलौकिक अशीच आहे. प्रत्यक्षातही अशा व्यक्तींना पित्तशामक औषधांनी चांगला फायदा झालेला दिसतो आणि त्या–त्या वेळेस थंड पाणी–थंड दूध दिले तर त्यांचा राग शमलेला दिसतो, कारण तो स्वभावदोष किंवा मानसिक लक्षण नसून शारीरिक विकृती असते. प्रत्यक्षात हे रुग्ण आभ्यन्तर पित्तप्रकोपाने त्रस्त असतात व आयुर्वेदीय पित्तशामक उपचाराने व्यवस्थित बरे होतात.तिखट खाल्ल्याने पित्तप्रकोप होतो? आपण जाणून घेणार आहोत पित्तप्रकोपाची कारणे. सर्वप्रथम विचार करू अर्थातच आहाराचा, कारण आयुर्वेद कोणत्याही आजाराच्या कारणांचा अभ्यास करताना सर्वाधिक महत्त्व आहाराला देते. शरीरामध्ये पित्त (उष्णता) वाढवायला कारणीभूत होणारा आहार म्हणजे तिखट–आंबट व खारट आहार.याठिकाणी समाजामध्ये असलेला एक गैरसमज दूर केला पाहिजे. आयुर्वेदीक डॉक्टरांकडे उपचारासाठी गेलात की आंबट–खारट बंद करावे लागते, हा तो गैरसमज. प्रत्यक्षात आंबट–खारट आहार पित्त वाढवतो व कफसुद्धा. त्यामुळे तुम्हाला पित्तविकार वा कफविकार असेल तरच आंबट–खारट सेवन नियंत्रणात आणण्याचा सल्ला दिला जातो. मात्र तुम्हाला वातविकार त्रस्त करत असेल तर मात्र आंबट–खारट खाणे उपयुक्त सिद्ध होऊ शकते. सरसकट एकच सल्ला ढोबळपणे देण्याची पद्धत आयुर्वेदामध्ये नाही. अर्थात तुमच्या आजारामध्ये कोणता रस टाळायचा याचा निर्णय डॉक्टरांनी घ्यायचा असतो.

# लातूरमध्ये अंधांच्या राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा होणे अभिमानास्पद जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे

**महात्मा बसवेश्वरमध्ये अंधाच्या राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ स्पर्धांचे शानदार उद्घाटन देशातील १५ राज्यातून ३५ खेळाडूसह ०५ प्रशिक्षक आणि १५ पालक लातूरमध्ये दाखल**

लातूर :– सध्या आपल्या देशामध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्यामुळे विविध खेळांमध्ये खेळाडू प्राविण्य मिळवत असून त्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. आज आपल्या लातूरमध्ये अंधांच्या राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात होत आहे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले. क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र, ऑल इंडिया चेस फेडरेशन फॉर द ब्लाइंड (ए.आय.सी.एफ.बी.), मराठवाडा स्पोर्ट्स कौन्सिल फॉर द ब्लाइंड, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड, लातूर, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि समर्पण फाउंडेशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज अंधाच्या राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ स्पर्धचे उद्घाटन समारंभ महाविद्यालयाच्या एम.सी.व्ही.सी.सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता यामध्ये ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून नॅबचे अध्यक्ष डॉ. विजयभाऊ राठी, प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, ॲड. सचिन चव्हाण, ए.एम.सी.ए.व्हि.सी.चे अध्यक्ष पंकज बेंद्रे, डॉ. माधव गोरे यांची यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जगतज्योती महात्मा बसवेश्वर आणि हेलन केलर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. पुढे बोलताना जगन्नाथ लकडे म्हणाले की, या स्पर्धेमध्ये देशाच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर विभागीयस्तरावर देशातील १५ राज्यातून ३५ खेळाडूसह ०५ प्रशिक्षक आणि १५ पालक सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतून निवडलेल्या खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळणार आहे ही एक गौरवाची बाब आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विजयभाऊ राठी म्हणाले की, अंध हे सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकुशलतेने आपल्या कामाची एक नवी ओळख निर्माण करत आहे. क्रीडा क्षेत्रामध्ये सुद्धा अंध व्यक्ती प्रत्येक खेळाच्या प्रकारामध्ये मनापासून सहभागी होत आहे. तसेच त्यांना त्यांचे कुटुंबीय सर्वतोपरी सहकार्य करत आहे. ही एक आनंददायी बाब आहे असे सांगून त्यांनी उपस्थित सर्वांना आजच्या स्पर्धेच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधव गोरे यांनी केले तर स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले तसेच ॲड. सचिन चव्हाण यांनीही आपले मनोगत व्यक्त करून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप करताना श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे म्हणाले की, आज आमच्या महाविद्यालयामध्ये अंधांच्या राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा संपन्न होत आहे याचा मला मनस्वी आनंद झाला आहे. आज विविध क्षेत्रासोबत क्रीडा क्षेत्रातही अंध व्यक्ती हा उत्तुंग भरारी मारत असून त्यांच्या या उज्वल यशामध्ये त्यांचे प्रशिक्षक तथा कुटुंबियांचा मोठा वाटा आहे असे सांगून त्यांनी उपस्थित सर्वांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. आशिष क्षीरसागर, विष्णू तात्पुरे, प्रशांत गवंडगावे, बालाजी होनराव, कृष्णा कोळी, संदीप मोरे, रंगनाथ लांडगे, नंदू काजापुरे, संतोष येचेवाड, जलील सय्यद, आनंद खोंपे, भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम केले.

# प्रत्येक मतदान केंद्रावर शनिवारी, रविवारी विशेष मतदार नोंदणी शिबीर

लातूर, दि. ३ (जिमाका) : भारत निवडणूक आयोग व राज्याचे मुख्यी निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार १ जानेवारी, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषीत केलेला आहे. शनिवार, ४ नोव्हेंबर २०२३ आणि रविवार, ५ नोव्हेंबर २०२३ रोजी लातूर तालुक्यातील सर्व मतदान केंद्रावर विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमसाठी प्रत्ये क मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तिरीय अधिकारी (बीएलओ) यांची नियुक्ती् करण्याकत आली असून ते मतदान केंद्रावर हजर राहणार आहेत. ज्यांतचे वय १ जानेवारी, २०२४ रोजी १८ किंवा त्याहपेक्षा अधिक होत आहे, अशा व्यक्तींनी मतदार यादीत नाव नसल्यास अर्ज नमुना नं. ६, अर्जदाराचा रंगीन फोटो, जन्म तारखेचा पुरावा म्हणून टी.सी. अथवा पॅनकार्ड अथवा आधारकार्ड, रहिवासी पुरावा म्हणून लाईट बील पावती किंवा रेशन कार्ड किंवा आधारकार्ड सादर करावे. मयत अथवा दुबार अथवा कायम स्थ लांतरीत असल्यीमुळे मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी अर्ज नमुना नं. ७ भरून, त्यासोबत मयत व्यक्तीचे मृत्युत प्रमाणपत्र, दुबार नोंद झाली असल्यास दुबार नोंदीचा पुरावा, कायम स्थ लांतरीत असल्यास सध्याचे राहत असलेल्याण वास्तदव्याकचा पुरावा जोडावा. मतदार यादीतील तपशीलात दुरुस्ती्, पत्ताा बदल, मतदान ओळखपत्र हरवले असल्या स अर्ज नमुना नं. ८ भरावा. त्यासोबत नाव, वय, जन्मा तारीख दुरुस्तीरसाठी आधारकार्ड किंवा पॅनकार्ड किंवा टी. सी, पत्ताा बदलसाठी रेशनकार्ड किंवा लाईट बील पावती किंवा ज्या तपशीलात दुरुस्ती करावयाची आहे, त्याआसबंधीचा पुरावा जोडावा. मतदार यादीशी आधार क्रमांक जोडणी करणे अर्ज नमुना नं. ६ ब भरून आधार क्रमांक, मतदार ओळखपत्र व मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. मतदार नोंदणीसाठी आवश्यंक कागदपत्र मतदान केंद्रस्तुरीय अधिकारी यांच्याकडे सादर करावीत किंवा र्हीीिं://ींशीी.शलळ.सीं.ळप अथवा र्हीीिं://लशे.ारहरीरिहीीर.सीं.ळप अथवा तींशी क्शश्रिश्रिळपश –ि या संकेतस्थीळावरुन ऑनलाईन स्वयरुपात मतदार नोंदणी करावी, असे अवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे आणि तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# 'फिट इंडिया मुव्हमेंट' अंतर्गत सामान्य ज्ञान चाचणीसाठी १० नोव्हेंबरपर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर (जिमाका) : केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्यावतीने २०१९ पासून शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणीचे आयोजन करण्यात येत आहे. भारतीय खेळांचा इतिहास स्थानिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळ भारतीय खेळाडू यांच्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे हा या चाचणीचा प्रमुख उद्देश आहे. यामध्ये ३.२५ कोटी रुपयांची बक्षिसे विद्यार्थी व शाळांना वाटप करण्यात येतात. केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणी 'फिट इंडिया क्विझ–३' चे आयोजन करण्यात आले असून यासाठी १० नोव्हेंबर २०२३ पर्यंत र्हीीिं:/षळींळपवळर.पींर.रल.ळप या कार्यालयीन संकेतस्थळावर शाळा व विद्यार्थी यांनी नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणी 'फिट इंडिया क्विझ–३' अंतर्गत विद्यार्थी व शाळांसाठी प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण ते राष्ट्रीयस्तरावरील प्राथमिक बक्षीस स्वरुपात २ हजार ते २५ लाख रुपयांपर्यंत बक्षीस दिले जाणार आहे. तरी जिल्ह्यातील शाळा व विद्यार्थी यांनी १० नोव्हेंबर २०२३ पर्यंत र्हीीिं:/षळींळपवळर.पींर.रल.ळप/ संकेतस्थळावर नोंदणी करून या चाचणीत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

# .डॉ. कापूरे गंगाधर यांना डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम आंतरराष्ट्रीय पुरस्कार

पूर्णा :– डॉ. कापूरे गंगाधर यांना डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम आंतरराष्ट्रीय पुरस्कार श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्रा.डॉ. कापूरे गंगाधर पुंडलिकराव यांची सामाजिक,शैक्षणिक व संशोधन कार्याची दखल घेत बुक ऑफ रेकॉर्ड या आंतरराष्ट्रीय संस्थेने डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम सेवा सन्मान हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले. प्रा. डॉ. कापूरे गंगाधर पुंडलिकराव यांनी आपल्या २३ वर्षाच्या शैक्षणिक कार्य काळात सामाजिक, शैक्षणिक चळवळीत उल्लेखनिय कार्य करत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत बुक ऑफ रेकॉर्ड या आंतरराष्ट्रीय संस्थेने डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम सेवा सन्मान या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करून गौरव करण्यात आला. या आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झालेले ते महाविद्यालयातील पहिलेच प्राध्यापक आहेत.



पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे सर्व पदाधिकारी,प्राध्यापक मित्र व नातेवाईक या सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले.

## दुकानगाळे वाटप प्रकरणी ग्रामपंचायत सदस्यास जीवे मारण्याची धमकी

लाखनी – पोहरा येथील ग्रामपंचायत सदस्य यशवंत खेडीकर वय ३८ यांना ग्रामविकास अधिकारी नरहरी बारस्कर वय ५२ यांचेकडून ग्रामपंचायत दुकानगाळे वाटप व करवाढ वाद प्रकरणी बुधवार (१नोव्हेंबर) ला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. यासंबंधीची तक्रार लाखनी पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ग्रामपंचायत सदस्याने दिव्यांग असलेल्या एकनाथ डोमा शिवणकर यांना दुकानगाळे वाटप व्हावे या हेतूने सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांना मागणी केली परंतु त्यांनी हेतुपुरस्पर आपल्या मर्जीतील भूषण हरीदास बनकर यांना दुकानाचे गाळेवाटप केले. गरजवंताला न्याय देण्यासंदर्भात ग्रामपंचायत सदस्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे रीतसर तक्रार दाखल केली. दोन्ही पक्षाकडील वादाचा प्रकार ताजा असतानाच ग्रामपंचायत सदस्याने बुधवारला सायंकाळी सहा वाजेदरम्यान ग्रामविकास अधिकारी बारस्कर यांना पंचायत समीतीमध्ये गटविकास अधिकारी यांच्यासोबत चर्चा करण्याचे निमंत्रण दिले. तेव्हा आपल्याला उशीर होईल म्हणून नरहरी बारस्कर यांनी भेटण्यास नकार दिला. तसेच या प्रकरणामुळे आपली नोकरी जाण्याची शक्यता असल्यामुळे त्यांनी ग्रामपंचायत सदस्य यशवंत खेडीकर यांना शिवीगाळ करीत या प्रकरणातील वाद चिघळवशील तर तुला गुंडाकरवी अथवा बंदुकीने गोळी मारून ठार करीन अशी धमकी दिली. यासंबंधीची तक्रार ग्रामपंचायत सदस्य यशवंत खेडीकर यांनी लाखनी पोलीस स्टेशन येथे दाखल केली आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून लाखनी पोलिसांनी भांदवीच्या कलम ५०६ नुसार अदखलपात्र गुन्हा नोंद केला आहे. याप्रकरणी पुढे काय घडणार याची उत्सुकता जनमाणसांमध्ये लागून आहे.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या जिल्हा सरचिटणीपदी अशोक माळगे

लातूर, दि.०३ : कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या लातूर जिल्हा सरचिटणीसपदी अशोक माळगे यांची निवड महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा इंगळे यांनी केली. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक अधीक्षक श्री. माळगे यांच्या या निवडीबद्दल नागपूर येथील अधिवेशनात श्री. इंगळे यांनी सत्कारही केला. कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ राज्य उपाध्यक्ष सुमित भुईगळ यांच्या सूचनेनुसार श्री.माळगे यांची निवड झाली. यासंबंधीचे नियुक्तीपत्र लातूर जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे यांनी नुकतेच त्यांना दिले. संघटनेतील सक्रिय सहभागाची दखल घेऊन श्री. माळगे यांची निवड झाल्याचे बनसोडे म्हणाले. या निवडीबद्दल माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी व कर्मचारी, कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, लातूर उपाध्यक्ष गणेश राठोड, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुभाष मस्के, जिल्हा परिषदेचे सुधीर बोकेफोडे, ओमकार वंजारे, पाटबंधारे विभागाचे निलराज बनसोडे, आरोग्य विभागाचे रवी उदगीरकर, प्रसिद्धी प्रमुख बालाजी केंद्रे, विविध संघटनांचे पदाधिकारी आदींनी श्री. माळगे यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले.



# प्रा. नयन भादुले–राजमाने यांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान

लातूर :– लातूर येथील विविध क्षेत्रात स्वतः चा स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या प्रा. नयन भादुले–राजमाने यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी रचनाकार शरद सिंह: एक मूल्यांकन या शीर्षका अंतर्गत मध्य प्रदेशातील लेखिका डॉ. (सुश्री) शरद सिंह यांच्या साहित्यावर अभ्यासपूर्ण शोध प्रबंध सादर केला. संशोधनास मार्गदर्शक प्रो.(डॉ.) सतीशजी यादव यांनी मार्गदर्शन केले.



प्रा. नयन भादुले–राजमाने एम.ए, बी.एड, एम.फील, डि. एस.एम आहेत. त्यांची ५ पुस्तके प्रकाशित आहेत, वृत्तपत्र, दिवाळी अंक, प्रासंगिक लेखन, आकाशवाणी कार्यक्रम प्रसारण,अशाप्रकारे त्या साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक चळवळीमध्ये सक्रिय सहभागी असतात. सध्या त्या गोविंदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालयात कार्यरत आहेत. याप्रसंगी संस्था सचिव श्री. धनराज जोशी, संस्था सदस्य रमेश बोरा, प्राचार्य डॉ. सुजाता चव्हाण, डॉ.सचिन प्रयाग सर्व प्राध्यापक वर्ग, नारी प्रबोधन मंच अध्यक्ष सुमती जगताप, समाज प्रबोधन मंचच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. कुसुमताई मोरे शब्दांकित साहित्य मंचचे पदाधिकारी,सर्व सदस्य,हिंदी साहित्य परिषद, डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ. रणजीत जाधव डॉ. हनुमंत पवार, डॉ. अमोल इंगळे, डॉ. राजकुमार बिराजदार, डॉ. विकास पाटील, डॉ. इमरान शेख, महेश राजमाने,श्रध्दा घेवारी, गौरी कुंबरे, सौरभ घेवारी, मनजीत कुंबरे, उमा कोल्हे, उल्का डोंबे, उज्वला गाढवे, आशा पाटील, रामलिंग भादुले, सागर राजमाने, विक्रांत हिंगमिरे,शितल शिपटे–बोराळे, ज्योती कदम, आकांक्षा घेवारी, अपूर्वा कुंबरे, शिवकांता गडकर इ. सर्वच स्तरातून व क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# आटा पेक्षा डाटाला महत्त्व देणारी पिढी निर्माण होत आहे – प्रो. डॉ.शेख एम. आय.

मुरुड /महेंद्र आल्टे : महाराष्ट्राच्या मातीत अनेक महान समाजसुधारक, संत, महापुरुष होऊन गेले. याच बहुजन महानायकांच्या अथक परिश्रमाने सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. शिक्षणानेच व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊ शकतो उपाशी रहा पण शिक्षण घ्या आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात एवढा विकास झाला की जग खूप जवळ आले आहे पण आटापेक्षा डाटाला महत्त्व देणारी पिढी निर्माण होत आहे असे मत प्रो. डॉ. शेख एम. आय. यांनी व्यक्त केले. संभाजी महाविद्यालयात दिनांक २६/ १० /२०२३ रोजी लोकप्रशासन, राज्यशास्त्र व समाजशास्त्र अभ्यास मंडळ व करिअर गाईड प्लेसमेंट सेल कार्यक्रमात उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ .ए.के.पिडगे होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून व कु. सय्यद साबिकीन, सय्यद सना सौजन व स्नेहल भुबे यांनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. यानंतर अभ्यास मंडळातील नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे स्वागत भिमाची लेखणी देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना ते म्हणाले की, भाषा कोणाची मक्तेदारी नाही ती सर्वांसाठी खुली आहे ती प्रत्येकाने अवगत केली पाहिजे. वाचन, लिखाण यामुळे आपले व्यक्तिमत्व खुलून येते प्रत्येकाने वाचले पाहिजे. 'करलो दुनिया मुट्ठी में' च्या नादात विद्यार्थ्यांचे वाचनाकडे दुर्लक्ष व जवळच्या नातेवाईकांचा विसर पडत आहे. तसेच लोकप्रशासन, राज्यशास्त्र व समाजशास्त्र हे सामाजिकशास्त्र असून ते एकमेकांशी संबंधित आहेत.मनाची इच्छा असेल तर कोणतेही साधन, भांडवल नसतानाही एखादा व्यवसाय चालू करू शकता. कोणताही उद्योग लहान किंवा मोठा नसतो तुम्ही फक्त सुरुवात करा उद्योग आपोआप गगनभरारी घेईल. राज्यशास्त्र विषयाचे 'सर्वोच्च न्यायालय' या विषयावर तर लोकप्रशासन विषयाचे 'ग्रामसभा' या विषयावर भित्तीपत्रकाचे अनावरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थी निखिल मांदळे यानेही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विषयाची विद्यार्थिनी कु. आवटे शिवानी तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय व प्रस्ताविक लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रो डॉ . एम व्ही चावरे यांनी केले. तर शेवटी कार्यक्रमाचे आभार लोकप्रशासन विषयाची विद्यार्थिनी कु प्रणिता शेट्टे हिने मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील समन्वयक प्रा. एम. बी. गायकवाड, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा .चव्हाण डी. आर., प्रा. दत्ता पवार,प्रा. पैठणकर एन. एल., प्रा. डॉ.गोरे बी. एम.यांनी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमास इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.मीना कदम प्रा. सुतार व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# संभाजी कॉलेजच्या बॉक्सरला सुवर्णपदक

मुरुड/महेंद्र आल्टे : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद विधी महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतर महाविद्यालयीन, अंतर– विभागीय बॉक्सिंग (पुरुष) स्पर्धा रविवार दिनांक २९ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा क्रीडा संकुल लातूर, येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धा विविध (अकरा) वजन गटात घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये जवळपास ४० ते ५० बॉक्सरनी विविध वजन गटात सहभाग नोंदवला. महाविद्यालयाचा बॉक्सर श्री.अविनाश उद्धव सकनुरे( एम. ए .भाग– १ ) याने ४८ ते ५१ किलो वजन गटात महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करून प्रतिस्पर्ध्यावर एकतर्फी विजय संपादन करून सुवर्णपदक मिळवले. यापूर्वी आंतर– महाविद्यालयीन 'अ' विभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये त्याने प्रथम स्थान पटकावले होते. सदर स्पर्धा श्री शामगीर कॉलेज दापका यांनी आयोजित करून जिल्हा क्रीडा संकुलामध्ये १८ ऑगस्ट २०२३ रोजी संपन्न केल्या होत्या. उपरोक्त वजन गटामध्ये सुवर्णपदक पटकावल्यामुळे त्याची निवड चंदीगड युनिव्हर्सिटी मोहाली (पंजाब) येथे दिनांक १५ ते २२ डिसेंबर २०२३ दरम्यान संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (पुरुष) स्पर्धेसाठी होणाऱ्या विद्यापीठाच्या मार्गदर्शन व सराव शिबिरासाठी झाली आहे. सदर खेळाडूस महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रो.मधुकर क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अनंत पिडगे, क्रीडा समिती सदस्य डॉ. बालू गोरे, डॉ. संदेश उबाळे, डॉ. सौ. मीना कदम, समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ,श्री.बी.एस पटाडे( दादा), संस्थेचे सेक्रेटरी श्री ॲड . विजय पाटील, यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सदर खेळाडूच्या यश संपादनामुळे मुरुड परिसरामध्ये सर्वत्र कौतुक होत आहे.






PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE